मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेचा आपत्कालीन कक्ष 24 तास सुरु

## अडचणीच्या वेळी मदतीसाठी महापालिकेचा पथक सज्ज : आपत्कालीन पथकाचे प्रमुख म्हणून क्षेत्रीय अधिकारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने मान्सून काळात करावयाच्या उपाययोजनांबाबत आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या स्तरावर आपत्कालीन प्रतिसाद पथक स्थापित करण्यात आले आहेत.

राज्यात अनेक ठिकाणी पाऊस सुरू आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून पुढील काही दिवस पिंपरी-चिंचवड शहर व शहरातून वाहणाऱ्या नद्यांच्या पात्रात अतिवृष्टी होण्याचा इशारा दिला आहे. पावसामुळे शहरात गटार, रस्ते, नाला अशा ठिकाणी पाणी तुंबणे, पाणी घरात शिरणे, घराची पडझड होणे, वादळ वाऱ्यामुळे झाडे पडणे अशा दुर्घटना घडू



शकतात. या पार्श्वभूमीवर कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवू नये यासाठी उपाययोजना करण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज आहेत.

तसेच शहरात कोठेही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षास संपर्क साधण्याचे आवाहन महापालिका अधिकाऱ्यांनी केले आहे.

### क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे असणार नियंत्रण

क्षेत्रीय कार्यालयनिहाय नियुक्त करण्यात आलेल्या आपत्कालीन प्रतिसाद पथकाचे प्रमुख संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी असणार आहेत. या पथकाचे साहाय्यक प्रमुख पथकातील कनिष्ठ अभियंता असणार आहेत

### अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक साहित्य

» पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना महापालिकेचे नाव व लोगो प्रिंट केलेले फ्लोरोसंट ॲप्रॉन व फ्लोरोसंट कॅप देण्यात येणार आहे. तसेच या कामकाजासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांकडे अर्धा इंच जाडीचा ३० मीटर लांबीचा नायलॉन रोप, मोठ्या प्रकाशाची रिचार्जेबल टॉर्च, बॅरिकेडिंग टेप, रेनकोट, गमबूट, सेफ्टी हेल्मेट, रबर हॅन्डग्लोज, कुदळ, फावडे, घमेले, वाहन, मेगाफोन, गरजेनुसार इतर आवश्यक साहित्य देण्यात आले आहे. पथकासोबत मदतीकरिता महाराष्ट्र सुरक्षा दलातील दोन जवानांची नेमणूक करण्यात आली आहे.

पथकामध्ये स्थापत्य विभागाचे कनिष्ठ अभियंता, जलनिस्सारण विभागाचे कनिष्ठ अभियंता, आरोग्य निरीक्षक, सफाई कामगार आदी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

“ आपत्कालीन पथकाच्या कामकाजाची वेळ रात्री १० ते सकाळी ६ असेल. सर्व पथकांनी व नियंत्रण कक्षातील कर्मचाऱ्यांनी एकमेकांशी समन्वय ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत. तातडीच्या वेळी अतिरिक्त मदतीची गरज भासल्यास क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी वरिष्ठांशी संपर्कात राहून पुढील कार्यवाही करण्याचे सांगितले. या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित विभागाने मान्सून कृती आराखड्यानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

- चंद्रकांत इंदलकर, सह-आयुक्त, महापालिका.

# शहरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## उन्नती सोशल फाऊंडेशन यांच्या पुढाकाराने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाऊंडेशन यांच्या पुढाकाराने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उन्नती सोशल फाऊंडेशन, आनंद हास्य क्लब, परफॉर्मिंग आर्टस् अँड वेलनेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन रोज आयकॉन कमर्शियल कॉम्प्लेक्स, कुणाल आयकॉन रोड, पिंपळे सौदागर येथे करण्यात आले होते.



जेष्ठ नागरिकांच्या सह तरुणांची संख्या देखील या उपक्रमाला अधिक होती. परफॉर्मिंग आर्टस् अँड वेलनेस अकॅडमीच्या योग शिक्षकांमार्फत योगासनांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. कार्यक्रमाला संबोधित करताना उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ.कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या, “प्राचीन भारतीय परंपरेत योग साधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सक्षम आणि सशक्त भारताच्या निर्मितीसाठी आपल्या प्राचीन योगसाधनेचे आपण पुनर्जीवन करत आहोत. पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी साहेबांच्या संकल्पनेतून पुढे आलेला आंतरराष्ट्रीय योग दिन हे संपूर्ण जगाला भारताच्या प्राचीन आणि उज्वल परंपरेची दखल घ्यायला लावत आहे. अबाल वृद्धांच्या सह प्रत्येकाने योग साधना अवलंबली पाहिजे. कारण ; योगसाधना हा एक दिवसीय इव्हेंट नाही तर दररोज अखंडपणे करण्याची साधना आहे.”

पी.के.इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक जगन्नाथ काटे म्हणाले, “मानवी जीवनाच्या प्रत्येक पैलूंच्या अखंड उन्नतीसाठी उन्नती सोशल फाऊंडेशन कटिबद्ध आहे. आरोग्य, शिक्षण पर्यावरण, सांस्कृतिक, धार्मिक, क्रीडा अश्या प्रत्येक क्षेत्रात उन्नती सोशल फाऊंडेशन आघाडीवर आहे. आज आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेला उपक्रम हा पिंपळे सौदागर आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा दृष्टीने निश्चितच दिशादर्शक ठरणार आहे. आपल्या भारताच्या प्राचीन परंपरेला पुढे घेऊन जाण्यासाठी उन्नती सोशल फाऊंडेशनच्या पुढाकाराने सुरू केलेल्या उपक्रमाला माझ्या मनापासून शुभेच्छा.

याप्रसंगी पी.के.इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक जगन्नाथ काटे, आनंद हास्य क्लबचे सदस्य आणि उन्नती सोशल फाऊंडेशन चे सर्व सदस्य जेष्ठ नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे विमानतळाच्या धावपट्टी विस्ताराला गती!

## केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी उचलली पावले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पावले उचण्यास सुरुवात केली आहे. विमानतळाचे संयुक्त सर्वेक्षण करण्यास परवानगी देऊन धावपट्टी विस्ताराची शक्यता तपासण्यासाठी हवाई दलाला सूचना कराव्यात, अशी विनंती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना मोहोळ यांनी पत्राद्वारे केली आहे. त्यामुळे पुणे विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्ताराला गती मिळण्याची चिन्हे आहेत.




मोहोळ यांनी पत्रात म्हटले आहे की, भारत सध्या जगातील तिसऱ्या क्रमांकाची देशांतर्गत हवाई वाहतूक बाजारपेठ आहे. त्यातही पुणे विमानतळ हे देशातील व्यग्र विमानतळांच्या यादीत ९ व्या क्रमांकावर आहे. गेल्या वर्षी ८० लाखांहून अधिक प्रवाशांनी पुणे विमानतळावरून प्रवास केला. भविष्यात ही वाढ कायम राखण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांसह विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे.

युरोपमधील देशांसह अमेरिका, जपान या देशांशी पुण्यातून थेट आंतरराष्ट्रीय विमान सेवा नसल्यामुळे शहराच्या विकासावर गंभीर परिणाम होत आहेत. मोठ्या आकाराच्या विमानांची सेवा विमानतळावरून सुरू होण्यासाठी सध्याच्या धावपट्टीचा विस्तार करण्याची गरज आहे. हवाई दलाच्या मालकीच्या पुणे विमानतळाच्या सध्याच्या धावपट्टीचा विस्तार केल्यास मोठ्या विमानांची विमानतळावर ये-जा होऊ शकेल आणि आंतरराष्ट्रीय विमानसेवेतही वाढ होईल, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

### हजार मीटरने लांबी वाढवावी लागणार

» पुणे विमानतळावरील सध्याच्या धावपट्टीची लांबी २ हजार ५३५ मीटर आणि ४५ मीटर रुंद आहे. या धावपट्टीवर एबी-३२१ प्रकारापर्यंतची विमाने उतरू शकतात. मात्र, त्यापेक्षा मोठ्या विमानांना उतरण्यासाठी धावपट्टीची लांबी वाढवावी लागणार आहे. धावपट्टीची लांबी एक हजार मीटरने वाढवावी लागणार आहे. यानंतर मोठी विमाने धावपट्टीवर उतरू शकतील आणि आंतरराष्ट्रीय विमानांची संख्याही वाढेल.

> पुणे हे शैक्षणिक, औद्योगिक आणि आयटी हब असल्याने या प्रस्तावामुळे शहराच्या विकासाला आणि मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. नवीन विमानतळ उभारण्यासाठी वेळ लागेल. त्यामुळे धावपट्टी विस्ताराची शक्यता तपासण्यासाठी योग्य सूचना देण्याची विनंती संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांना करण्यात आली आहे. त्यांची सोमवारी भेटही घेणार आहे.
>
> - मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, नागरी हवाई वाहतूक.

# कात्रज तलावाच्या दुर्गंधीची एनजीटीने घेतली दखल

## पुणे महापालिकेला सहा महिन्यांत काम पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज तलावातून येणाऱ्या दुर्गंधीमुळे बिबवेवाडी सोसायटीतील स्थानिक रहिवाशांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारींची राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी NGT) स्वत:हून दखल घेतली आहे. एनजीटीच्या पश्चिम खंडपीठाने पुणे महापालिकेला सहा महिन्यांत काम पूर्ण करून न्यायाधिकरणाकडे अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी), केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी), जिल्हाधिकारी आणि पुणे महापालिका या चार प्राधिकरणांना याबाबत नोटीस देण्यात आली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वकील मानसी जोशी यांनी प्रतिज्ञापत्र दाखल करून दावा केला की, अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट दिली. १६ मे रोजी अधिकारी पेशवे तलाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कात्रज तलावाला भेट दिली, तेव्हा कात्रज तलावात एकही नाला वाहात नसल्याचे दिसून आले. या तलावाजवळ दोन पावसाळी वाहिन्या दिसल्या मात्र त्या कोरड्या होत्या. तलावाच्या गोळा केलेल्या पाण्याच्या नमुन्याचा रंग किंचित तपकिरी आहे. मात्र, त्याला दुर्गंधी नाही. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी निधीची गरज आहे.



महापालिकेचे वकील राहुल गर्ग म्हणाले, राजीव गांधी प्राणिसंग्रहालय आणि वन्यजीव संशोधन केंद्र परिसरातील तलावाच्या परिसरात नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. १५ व्या वित्त आयोगांतर्गत महापालिकेच्या ड्रेनेज ऑपरेशन आणि मेंटेनन्स विभागाला कात्रज, जांभूळवाडी आणि पाषाण तलाव आणि परिसरासाठी ८९४.१६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

संतोषनगर नाला, पेशवे तलाव ओव्हरफ्लो या दोन नाल्यांसाठी सुमारे २३० मीटर लांबीच्या गॅबियन भिंती विकसित करण्यात आल्या आहेत. दोन एमएलडी क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. जूनअखेर हे काम पूर्ण होईल. या कामामुळे उघड्या नाल्यातून वाहणारे सांडपाणी बंद होणार आहे. यामुळे परिसरातील दुर्गंधी दूर होईल. कात्रज तलावात सांडपाणी जाऊ नये म्हणून कात्रज तलावाशेजारी ६०० मिमी व्यासाची ११० मीटर लांबीची सीवरलाइन विकसित केली गेली आहे. राजीव गांधी प्राणिसंग्रहालयातील कात्रज तलावाचे मार्च २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्यात आले आहे.

नाल्यांमध्ये वाहून जाणारे सांडपाणी थांबवण्यासाठी केके मार्केट ते पद्मजा कल्व्हर्टपर्यंत ९०० मिमी व्यासाची आणि ११० मीटर लांबीची सीवरलाइन विकसित करण्यात आली आहे, अशी माहितीही गर्ग यांनी दिली. पुणे महापालिकेने उर्वरित काम सहा महिन्यांच्या आत पूर्ण करावे. महापालिकेकडून लवकरात लवकर या निधीची तरतूद करावी, असे निर्देश एनजीटीने दिले आहेत.

# शिकाऊ डॉक्टर व प्रशासनाचे जुळेनात सूर

## यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील डॉक्टरांचे मनुष्यबळ कमी पडल्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला

**पिंपरी | प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील डॉक्टरांचे मनुष्यबळ कमी पडल्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम (पीजी) सुरू करण्यात आला. टप्प्याटप्प्याने येथील १३ विभागांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले; पण अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या डॉक्टरांचा कल रुग्णसेवेकडे नसल्याचे गेल्या काही महिन्यांपासून निदर्शनास येत आहे.

ज्या हेतूने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला, तो हेतूच साध्य होत नाही. त्यामुळे येथील विद्यार्थी डॉक्टर व प्रशासन यांच्यामध्ये ताळमेळ आवश्यक असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

'वायसीएम' रुग्णालयात मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे कधीकाळी इथे येणारा शहरातील मध्यमवर्गीय व सर्वसामान्य नागरिक नाइलाजास्तव खासगी रुग्णालयाकडे वळत आहे. या ठिकाणी येणारा बहुतांश वर्ग पिंपरी-चिंचवड, पुणे व आजूबाजूच्या जिल्ह्यांतील आहे. या रुग्णांना येथील व्यवस्थेबाबत फारशी माहिती नसते.

त्याचाच फायदा घेऊन येथील निवासी डॉक्टर त्यांना इतर खासगी हॉस्पिटलमध्ये भरती होण्याविषयी सुचवितात. रुग्णांनाही कोणी अधिकारी किंवा राजकीय नेत्यांच्या शिफारशी शिवाय भरती न करणे, शस्त्रक्रियेसाठी ताटकळत ठेवणे असे प्रकार येथे घडतात. या प्रकारांना आळा बसण्यासाठी येथील प्रशासनानेच कठोर पावले उचलणे आवश्यक आहे.

पदव्युत्तर पदवीसाठी आलेले डॉक्टर हे 'पीजी 'च्या वरिष्ठ प्राध्यापकाच्या हाताखाली असतात. त्यामुळे, ते बऱ्याचवेळा महापालिकेच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांचेही ऐकत नाहीत. 'वायसीएम' हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंतर्गत असलेले रुग्णालय असल्याने अनेक गरीब रुग्ण हे आजी-माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्त्यांच्या शिफारशींवरून आलेले असतात, अशावेळी त्यांना सामाजिक बांधिलकीतून हाताळणे आणि आवश्यक सेवा देणे गरजेचे असते.




### शिकाऊ डॉक्टरांचे कान टोचले पाहिजेत!

» पदव्युत्तर पदवीसाठी आलेले डॉक्टर हे त्यांच्या विभाग प्रमुखांच्या म्हणजेच 'पीजी'च्या वरिष्ठ प्राध्यापकाच्या हाताखाली असतात. त्यामुळे, ते बऱ्याचवेळा महापालिकेच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांचेही ऐकत नाहीत. नवीन शिकाऊ डॉक्टरांना ही अत्यंत महत्त्वाची गोष्टच समजत नाही. त्यामुळे, अनेकवेळा रुग्णालयात वादाचे प्रसंग उद्भवतात. वाद झाले की शिकाऊ डॉक्टरांची संघटना लगेच संपाचे हत्यार उपासते. त्यामुळे, या डॉक्टरांना शिस्त कोणी लावायची ? हा खरा प्रश्न उपस्थित होतो. त्यावर उपाय म्हणून विभाग प्रमुखांनीच आपल्या अखत्यारीतील डॉक्टरांना शिस्तीचे व सभ्यतेचे धडे दिले पाहिजेत. विभाग प्रमुखांच्या हातात शिकाऊ डॉक्टरांचे गुणपत्रक असल्याने त्यांनीच आता त्यांचे कान टोचले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> 'वायसीएम' रुग्णालय उभारण्यामागचा हेतू 'रुग्णसेवा' हा आहे. इथे जरी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाला होता, तरी त्यामागेही रुग्णांवर उपचारासाठी डॉक्टर उपलब्ध व्हावेत, हाच हेतू होता; मात्र सध्या परिस्थिती बदलली आहे. विभाग प्रमुख आणि अधिष्ठाता यांनी मतभेद बाजूला ठेवून याकडे लक्ष देणे आवश्यक आहे..
>
> - एक निवृत्त आरोग्य अधिकारी

### काय करणे आवश्यक ?...

- » प्रत्येक रुग्णांना योग्य उपचार देऊन नोंद ठेवा
- » सर्व रुग्णांची माहिती ठेवणे गरजेचे
- » ससूनमध्ये किती रुग्णांना पाठविले, उपचाराशिवाय किती रुग्ण गेले, याचीही नोंद हवी
- » 'कट प्रॅक्टिस' रोखण्यासाठी कठोर नियम
- » रुग्णालयाचे ऑडिट होणे आवश्यक
- » निवासी डॉक्टर, प्राध्यापक यांच्या कामाचे निरीक्षण गरजेचे
- » काही विभागांत कर्मचारी भरती व्हावी
- » रूग्णसेवेवर भर देणाऱ्या अधिष्ठाता व विभाग प्रमुखांची नेमणूक करणे

> शिकाऊ डॉक्टर आल्यामुळे रुग्णालयाचे मनुष्यबळ वाढले आहे; मात्र या डॉक्टरांकडून कशी सेवा दिली जाते, हा चौकशीचा भाग आहे. या डॉक्टरांच्या रुग्णसेवेविषयी काही तक्रार असेल, तर संबंधितांनी आम्हाला कळवावे. स्वतःच्या कर्तव्यांविषयी जाणीव करून देण्यासाठी आम्ही त्यांना मार्गदर्शन करू. कोणी 'कट प्रॅक्टिस' करत असेल, तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल.
>
> - विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# योगासनामुळे आरोग्याबरोबरच मिळते मन:शांती : अश्विनी जगताप

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देऊळमळा पटांगणात योगामध्ये आमदार जगताप यांनी सहभाग घेतला

**पिंपरी | प्रतिनिधी**

योगाचे एक वैशिष्ट असे आहे की, तुम्ही युवक असा की वयोवृध्द, निरोगी असा की आजारी, योगाभ्यास सर्वांसाठी लाभदाई आहे आणि तो सर्वांना प्रगती पथाकडे घेऊन जातो. योगासनामुळे आरोग्याबरोबरच मिळते मन:शांती मिळते, असे मत चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी व्यक्त केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सोहम योग साधना, क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती, पवना ग्रुप आणि माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवडगावातील देऊळमळा पटांगणात आयोजित केलेल्या योगामध्ये आमदार जगताप यांनी सहभाग घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष गिरीश प्रभुणे, सोहम योग साधनाचे दिगंबर उचगांवकर, अनुजा उचगावकर, अश्विनी चिंचवडे, ॲड. सतिश गोरडे, उद्योजक रवी नामदे, नितीन बारणे, दुर्गेश देशमुख सहभागी झाले होते. ऑनलाइन, ऑफलाइन पद्धतीने झालेल्या या योगामध्ये सुमारे 800 जणांनी सहभाग घेतला.





लोकनेते लक्ष्मण जगताप यांचे योगावर प्रचंड प्रेम होते. नित्यनियमाने ते दररोज योगा करत होते अशी आठवण सांगत आमदार जगताप म्हणाल्या, योगामुळे वजनात घट, सशक्त आणि लवचिक शरीर, तजेलदार त्वचा, शांत तसेच प्रसन्न मन आणि उत्तम आरोग्य होते. यातली जी गोष्ट तुम्हाला हवी असते ती द्यायला योग समर्थ आहे. वयपरत्वे आपली आसनांची समज अधिक परिपक्व होऊ लागते. मग आपण शारीरिक आसनांसोबत अंतर्गत सुक्ष्मतेवर अधिक कार्य करू लागतो. सुरुवातीस योगासने करणे जड जाते. हळूहळू सरावाने आणि शरीर लवचीक झाल्याने ही अवघड दिसणारी आसने स्थिर व तणावमुक्त (सुखाची) होऊ लागतात.

दिगंबर उचगांवकर, अनुजा उचगावकर यांनी योगाचे धडे दिले. सुर्यनमस्कार, शयन स्थिती आसने, सेतू बंधासन, पवन भुक्तासन, शवासन, भुजांगसन, शलआसन, मकरासन, भद्रासन, शशांकासन, ताडासन, वृक्षासन, त्रिकोआसन, शवासन, कपालभाती, अनुलोम-विलोनम अशी विविध आसने करण्यात आले. यात 800 जणांनी सहभाग घेतला होता.

# भोर शहरात उभारले 26 ठिकाणी सौर पथदिवे

## भोर नगरपरिषदेचा अपारंपरिक ऊर्जा विकास योजनेतर्गत प्रकल्प

**पुणे | प्रतिनिधी**

वीज व मनुष्यबळासाठी होणारा आर्थिक खर्च कमी करण्यासाठी भोर नगर परिषदेने शहरातील २६ ठिकाणी सौर पथदिवे (हायमास्ट) उभारले आहेत. अपारंपरिक ऊर्जा विकास योजनेंतर्गत हा प्रकल्प राबवण्यात आला आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाकडून एक कोटी ३९ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

या योजनेंतर्गत शहरातील २५ सार्वजनिक ठिकाणांसह वाघजाई मंदिराची निवड करण्यात आली आहे. या प्रकल्पाबाबत जून २०२३मध्ये नगर परिषदेने प्रशासकीय ठराव करून जिल्हाधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी पाठवला होता. आमदार संग्राम थोपटे यांनी जिल्हा नियोजन मंडळ समितीच्या बैठकीमध्ये यासाठी निधीची मागणी केली होती.

नैसर्गिक ६६ सूर्यप्रकाशाचा उपयोग करून 'हायमास्ट' दिव्यांची उभारणी केली आहे. संपूर्ण युनिट स्वयंचलित आहे. त्यामुळे वीजबिलाचा खर्च; तसेच दररोज दिवे लावणे, बंद करणे यावरील मानवी खर्चाची बचत होणार असल्याचे मुख्याधिकारी श्रीराम पवार यांनी सांगितले. संभाजीनगर येथील बालाजी एंटरप्रायजेस कंपनीला या प्रकल्पाचे काम दिले असून, पुढील पाच वर्षे ते या पथदिव्यांची देखभाल, दुरुस्ती पाहणार आहेत.



### बिघाड झाल्यास मिळणार तत्काळ माहिती

» कमी उन्हातही ते चार्ज होऊ शकतात. त्यामुळे पावसाळ्यातसुद्धा ते सुरू राहतील, असा दावा कंपनीने केला आहे. हे संपूर्ण युनिट स्वयंचलित असून, त्याला तीन प्रकारचे 'इंडिकेटर' जोडले आहेत. यामध्ये काही बिघाड झाल्यास त्यातून तत्काळ माहिती मिळणार आहे. वाघजाई मंदिर येथे मात्र बारा मीटर उंचीचा व आठ पॅनेल सौर दिव्याची उभारणी केली आहे.

जमिनीत एक चौरस मीटर व आठ फूट खोल फुटिंग करून २५ ठिकाणी नऊ मीटर उंचीचे खांब उभारले आहेत. त्यावर ५० वॅटचे सहा बल्ब, २७० वॅटचे सहा पॅनेल आणि १२ वॅटच्या सहा बॅटऱ्या आहेत. या पोलचे वजन तीनशे किलो आहे.

### पंधरा ठिकाणचे दिवे सुरू

» सध्या शहरातील पंधरा ठिकाणचे दिवे सुरू झाले असून, उर्वरित ठिकाणचे दिवे आठ दिवसांत सुरू होतील, असे नगर परिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे. भोरमधील हा उपक्रम पथदर्शी ठरत असून, यातून विजेची बचत होण्यासोबतच नगर परिषदेचा वीज बिलावरील लाखोंचा खर्चही वाचणार आहे.

एक दिवस सूर्यप्रकाशात पॅनेल चार्ज झाल्यानंतर तीन दिवसांचा 'बॅकअप' मिळणार आहे. सायंकाळी साडेसहा ते पहाटे सहा या वेळेत हे दिवे आपोआप प्रकाशमान होणार आहेत.

शहरात नवीन रस्ता तयार होत असताना, अधिकाधिक सरकार सौर पथदिवे लावण्याची विनंती करत आहे.जरी सौर दिवे नेहमीच्या तुलनेत जास्त किमतीचे असले तरी दीर्घकाळासाठी, ते मोठ्या प्रमाणात विजेची बचत करण्यास मदत करू शकतात.

तसेच उच्च लुमेन चिप्स डिझाइन केल्या आहेत, सौर पथदिव्यांमध्ये कमी वॅटेजसह देखील खूप उच्च लुमेन असू शकतात, जे सौर दिव्यांची किंमत राखू शकतात आणि त्याच वेळी, प्रत्येक रस्त्याची लक्स आवश्यकता पूर्ण करू शकतात.सोलर गार्डन दिवे नियमितपणे सोलर लाइट्सच्या तुलनेत मोठे वॅटेज नसतात, फक्त 10 ते 20W, परंतु ते खूप कमी लक्सची विनंती असलेल्या ठिकाणी वापरले जातात आणि फक्त वातावरण तयार करणे आवश्यक असते.

सौर उद्यान दिवे 3 मीटर उंच खांबांसह ठेवलेले आहेत आणि ते विनामूल्य वायरिंग आहे, त्यामुळे ते कधीही आणि कोणत्याही ठिकाणी जोडले जाऊ शकते. सोलर फ्लडलाइट्स, याला आपण सौर सुरक्षा दिवे देखील म्हणतो.हे सौर दिवे कौटुंबिक वापरात मोठ्या प्रमाणावर वापरले जातात जेव्हा तुम्हाला ते कॅम्पिंगसाठी किंवा रात्री काम करण्यासाठी आणायचे असतात.चार्ज होण्यासाठी तुम्हाला फक्त दिवसा सौर दिवे लावावे लागतील

# जुन्नर शहर अतिक्रमण मुक्त करणार : आमदार अतुल बेनके

## जुन्नर नगर परिषद सभागृहात प्रशासकीय कामकाजांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील भटकी जनावरे, कुत्री तसेच रस्त्यावरील अतिक्रमणे, हातगाडी व भाजीपाला फळ विक्रेते यांची मोठ्या प्रमाणात झालेली अतिक्रमणे येत्या काही दिवसात काढण्यात येणार असून अतिक्रमणमुक्त जुन्नर शहर करण्यात येणार आहे, असे आश्वासन जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी दिले.

शहरात सुरू असलेल्या विकास कामांबाबत नागरिकांचे तसेच माजी नगरसेवक शहर लोकप्रतिनिधी यांचे काय मत आहे हे जाणून घेण्याकरिता तसेच प्रशासनात समन्वय राहण्याकरिता नगरपरिषदेत कामकाज आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार अतुल बेनके बोलत होतेना शैक्षणिक साहित्य देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेतला.



जुन्नर नगर परिषद येथील सभागृहात आमदार अतुल बेनके यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी (दि. २०) प्रशासकीय कामकाजांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्याधिकारी प्रशासक संदीप भोळे, माजी नगराध्यक्ष श्याम पांडे, माजी उपनगराध्यक्ष दीपेश परदेशी, माजी नगरसेवक भाऊ कुंभार, फिरोज पठाण, अंकिता गोसावी, अश्विनी गवळी, मोनाली मस्के, कविता गुंजाळ, सुवर्णा बनकर, सना मन्सुरी, हाजरा इनामदार, अविनाश करडीले, नंदकुमार तांबोळी, मधुकर काजळे आदींसह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

जुने बस स्थानक ते पाच रस्ता चौक मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील फुटपाथवर झालेले अतिक्रमण येत्या काही दिवसात हटविण्याच्या सूचना आमदार अतुल बेनके यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या. शिवाय शहरात मोठ्या प्रमाणात लावण्यात येत असलेले फ्लेक्स तातडीने हटवून याबाबत नियमावली तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतही त्यांनी यावेळी सांगितले.

जुन्नर नगरपरिषद मालकीच्या पद्मावती तलाव परिसरात झालेली अतिक्रमणे मोजणी करून काढावी लागणार आहेत तसेच नगरपरिषदेचा जलतरण तलाव अनेक वर्षांपासून बंद आहे. तो नव्याने दुरुस्त करण्याकरिता सुमारे एक कोटीचा निधी देऊन नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या सर्व सूचनांबाबत होणाऱ्या कार्यवाहीसाठी पुढील महिन्यात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### स्वच्छ पाणी पुरविणार...

» शहरातील नागरिकांना कमी दाबाने तसेच अस्वच्छ पाणीपुरवठा होत असल्याच्या अनेक तक्रारी आल्याने असलेल्या यंत्रणेत योग्य ती दुरुस्ती करून पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. तसेच आगामी काळात साथीचे आजार रोखण्याकरिता शहरात नियमितपणे धुरळणी तसेच नालेसफाई, ठीक-ठिकाणी साठणारे सांडपाणी व कचरा याबाबत गांभीर्याने उपाययोजना करण्याच्या सूचना आमदार बेनके यांनी यावेळी दिल्या.